**नि.दि.दा. ५५/२०१८**
**नि.क्र. ६३**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. ०१**
**शपथेवर कथन करतो की,**

**नाव — राजेश रामकृष्ण चिंचमलातपुरे**

**वादीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. वाय. एन. नागले**

**१०.** शेत गट क्र.१३०/१० ही शेती माझी व प्रतिवादी यांच्यात मिळुन आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या प्रतिदाव्याला प्रतिवादी क्र. २ ते ५ यांची संमती नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझया व वादीच्या शेताच्या दक्षिणेकडे असलेले उघडे व रमेश पाचघरे यांचे शेत आमच्या शेतापेक्षा खालच्या खोलगट भागात आहेत. हे म्हणणे खरे आहे की, लोणी ते आलोडा रस्त्याच्या उत्तर बाजुस असलेला पांदन रस्ता माझया शेता पर्यंत जातो. हे म्हणणे खरे नाही की, शामराव उघडे यांच्या शेताच्या उत्तर बाजुला असलेला रस्ता पांदन रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, शामराव उघडे यांच्या शेताच्या उत्तर बाजुला रस्त्यानंतर मारुती देवस्थान यांचे शेत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मारुती देवस्थानच्या दक्षिण बाजुला असलेला रस्ता हा त्यांच्या शेताच्या बाहेरुन गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पडीत जागेची नोंद सात बारा उता—यावर होत असते. मला माहीत नाही की, मारुती देवस्थानच्या शेतामध्ये पडीत जागा दाखवलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझया शेताच्या पश्चिमेला असलेला रस्ता हा पुढे उत्तरेकडे जातो. हे म्हणणे खरे नाही की, माझया शेताच्या पश्चिमेला असणारा रस्ता हा माझया शेताच्या बाहेरुन आहे.

**११.** माझे शेत गट क्र. १३०/१० याचे क्षेत्रफळ ६५ आर आहे. माझया शेताच्या सात बा—यामध्ये पडीत जमीन दाखविलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझया शेतातुन रस्ता गेला आहे, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझया शेताच्या दक्षिण—पश्चिम कोप—यावरुन शेतात जातो. प्रस्तुतचा दावा दाखल केल्यानंतर माझया शेताची पाहणी कमीशनर मार्फत झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, कमीशनर येण्याच्या आदल्या दिवशी मी तारेचे कुंपन शेताच्या पश्चिमेकडील धु—यावर टाकले. हे म्हणणे खरे आहे की, माझया शेताच्या पश्चिमेकडील धु—यावर झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पश्चिमेकडील धु—या वर असलेल्या झाडा झुडपांनतर रस्ता गेलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझया शेतात जाणारा रस्ता हा ट्रक, ट्रक्टर व बैलबंडीचा आहे. हे म्हणणे खरे

नाही की, प्रस्तुत दाव्याच्या अंतरिम अर्जाच्या आदेशानंतर वादी यांनी परत रस्त्यावरुन जाणे येणे चालु केले. हे म्हणणे खरे नाही की, वादी त्याच रस्त्याने हल्ली वहीवाट करतात. मला माहीत नाही की, उमेकर यांच्या सोबत झालेल्या वादाची तहसिल येथे दाखल केलेल्या प्रकरणाची प्रत प्रस्तुतच्या अभिलेखावर दाखल केलेली आहे किंवा नाही. मला माहीत नाही की, उमेकर कुटुंबियासोबत कोणताही वाद झाला नाही.

**१२.** प्र. तुमच्या शेताच्या पश्चिमेकडील धु—यावर तारेचे कुंपन नसल्याने तुम्ही सदरची बाब कॅव्हेट मध्ये नमुद केली नव्हती ?

उ. कुंपन होते.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, माइया सरतपासातील परिच्छेद क्र.५ मधील पान क्र. ६ वरील मजकुर हा शेताच्या वाद रस्त्याबाबतचा आहे.

**<u>माध्यांन्हाची वेळ झाल्याने उलटतपास तहकुब करण्यात आला.</u>**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

दिनांक : १६/०१/२०२५.
ठिकाण : वरुड.

Ajit B Katte

Digitally signed by Ajit B Katte
Date: 2025.01.16 16:59:19 +0530

**( ए. बी. कट्टे )**
दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
वरुड